# 2022 मधील राष्ट्रपतीपदाची निवडणूक एक विश्लेषण

**प्रा. डॉ. चंद्रशेखर ढोले**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

१५व्या राष्ट्रपती पदासाठी दिनांक 18 जूलै 2022 वार सोमवार रोजी देशभरात निवडणूक झाली. भारताचे राष्ट्रपती प्रत्यक्ष जनतेमार्फत निवडले जात नाहीत, तर निर्वाचन मंडळाकडून त्याची निवड केली जाते. पुढील सदस्यांचा या मंडळात समावेश होतो.

१) संसदेच्या दोन्ही सभागृहातील सदस्य
२) राज्य विधिमंडळांनी निवडून आलेले विधानसभा सदस्य.
३) दिल्ली व पुदुच्चेरी या केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभेतील सदस्य.

या सदस्यांना किंवा राष्ट्रपतीपदाच्या मतदारांना राज्यातील राजधानीच्या ठिकाणी ज्या तारखेला मतदान आहे त्या तारखेला राजधानी मध्ये उपस्थित राहून मतदान करावे लागते. आतापर्यंत 1952 पासून पंधरा राष्ट्रपती भारतामध्ये झाले. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद व शेवटचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे होते. तर 16 व्या राष्ट्रपती पदासाठी 18 जून 2022 रोजी मतदान झाले व दिनांक 21 जूलै 2022 रोजी मतमोजणी झाली. 15 व्या राष्ट्रपती पदासाठी एकूण मतदार पुढील प्रमाणे आहेत. लोकसभा 543, राज्यसभा 233, विधानसभा 4120 मतांची एकूण मत मूल्य गणित आकडेवारी एकूण मते 10 लाख 79 हजार 206. देशातील दोन प्रबळ आघाड्या व इतरांकडे असलेले मते एनडीएकडे पाच लाख सव्वीस हजार चारशे वीस, युपीए दोन लाख 59 हजार 892 इतर दोन लाख 92 हजार 442 तर विजयासाठी जो आवश्यक कोटा ठरविण्यात आला आहे तो पुढील प्रमाणे आहे. विजयासाठी आवश्यक मते पाच लाख 49 हजार 442. 15 व्या राष्ट्रपती पदासाठी एनडीए कडून एक आदिवासी महिला द्रौपदी मुर्मु यांना उमेदवारी देण्यात आली होती तर युपीएकडून यशवंत सिन्हा जे एकेकाळी भाजपामध्ये होते त्यांना उमेदवारी देण्यात आली. राष्ट्रपती व उपराष्ट्रपती पदासाठी 1952 मध्ये व 1993 मध्ये घटना दुरुस्ती करून काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. राष्ट्रपती पदासाठी उमेदवारी अर्ज भरणाऱ्या उमेदवाराचे नाव 50 मतदारांनी सुचवणे व 50 मतदारांनी अनुमोदन दिले पाहिजे ही दुरुस्ती घटनेमध्ये करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रपती पदासाठी अर्ज भरणाऱ्या उमेदवारांनी 15000/- अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. 1997 च्या अगोदर या पदासाठी सूचक व अनुमोदक 10 तसेच 2500 अनामत रक्कम लागते असा नियम होता. 1952 ते 2022 पर्यंतचे भारताचे राष्ट्रपती पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | नाव | इ.स. |
|---|---|---|
| १) | डॉ. राजेंद्र प्रसाद | 1952 |
| २) | डॉ. राजेंद्र प्रसाद | 1957 |
| ३) | डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन | 1962 |
| ४) | झाकीर हुसेन | 1967 |
| ५) | व्ही.व्ही. गिरी | 1967 |
| ६) | फक्रुद्दीन अली अहमद | 1974 |
| ७) | नीलम संजीव रेड्डी | 1977 |

| | | |
|---|---|---|
| ८) | ग्यानी झैल सिंग | 1982 |
| ९) | आर. व्यंकटरमन | 1987 |
| १०) | शंकर दयाळ शर्मा | 1992 |
| ११) | के. आर. नारायण | 1997 |
| १२) | डॉ.एपीजे अब्दुल कलाम | 2002 |
| १३) | प्रतिभा पाटील | 2007 |
| १४) | प्रणव मुखर्जी | 2012 |
| १५) | रामनाथ कोविंद | 2017 |
| १६) | द्रोपदी मुर्मु | 2022 नंतर |

विशेष म्हणजे आतापर्यंत तीन मुस्लिम समूहाचे राष्ट्रपती झाले हेच भारतीय लोकशाहीचे खास वैशिष्ट्य. आणि यामुळे जगातील सगळ्यात मोठी लोकशाही म्हणून भारताचा गौरव केला जातो. तर प्रतिभा पाटील 2007 व द्रौपदी मुर्मु 2022 या दोन महिलांचा भारतातील या सर्वोच्च पदावर बसण्याचा बहुमान मिळाला आणि भारताने जगाला दाखवून दिले की जात व धर्म या आधारावर कोणताही भेदभाव न करता आम्ही सर्वांना समान संधी देतो असा संदेश जगाला दिला. एनडीए मध्ये सहभागी नसलेल्या अनेक पक्षांनी द्रोपदी मुर्मु यांना आदिवासी महिला देशाच्या राष्ट्रपती होत आहेत म्हणून जाहीर पाठिंबा दिला. त्यात शिवसेना हा पक्ष आहे.

**पंधराव्या राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीचे विश्लेषण**

दोन्ही आघाड्याकडून आपआपले उमेदवार या निवडणुकीत उभे करण्यात आले होते. विशेष म्हणजे द्रौपदी मुर्मु या भाजपाच्या उमेदवार आहेत तर विरोधकाकडून यशवंत सिन्हा यांना उमेदवारी देण्यात आली आहे ते पण मूळचे अटलजी व आडवाणींच्या तालमीत भाजपात वाढलेले भाजप नेते होते पण आता ते भाजपाच्या विरोधात आहेत. द्रोपदी मुर्मु यांना संसदेच्या मतदारांच्या 798 पैकी पाचशे चाळीस मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी यशवंत सिन्हा यांना खासदारांची 208 मते मिळाली. या मताचे मूल्य द्रोपदी मुर्मु यांना तीन लाख 78 हजार तर यशवंत सिन्हा यांना एक लाख पंचेचाळीस हजार एवढे होते. यात 15 मते बाद झाली होती. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या एनडीएच्या द्रौपदी मुर्मु यांना सहा लाख 76 हजार 803 इतकी मते मिळाली आणि त्या विजयी झाल्या. तर त्यांचे प्रतिस्पर्धी विरोधी आघाडीचे उमेदवार यशवंत सिन्हा यांना तीन लाख 80177 इतके मत मूल्य प्राप्त झाले. एनडीएच्या द्रौपदी मुर्मु यांना एकूण मतांच्या 64 टक्के मते मिळाली तर विरोधी पक्षाचे उमेदवार यशवंत सिन्हा यांना 36 टक्के मते प्राप्त झाली आहेत. त्या पहिल्या महिला आदिवासी राष्ट्रपती झाल्या आहेत.

**2022 च्या राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीचे निष्कर्ष:-**

१) शिवसेनेचा एनडीएच्या उमेदवार द्रौपदी मुर्मु यांना पाठिंबा.
२) काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाराष्ट्रातील खासदार व आमदारांचे एकगठ्ठा मतदान यशवंत सिन्हा यांना मिळाले.
३) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा 200 मते द्रौपदी मुर्मु यांना महाराष्ट्रातून मिळणार हा दावा फोल ठरला.
४) या निवडणुकीत 99 टक्के मतदान झाले होते.
५) एनडीए मध्ये नसलेल्या वायएसआर काँग्रेस बिजू जनता दल व शिवसेना यांनी द्रौपदी मुर्मु यांना पाठिंबा दिला होता.
६) द्रौपदी मुर्मु यांच्यामुळे भाजपाला झारखंड छत्तीसगढ ओडिसा व महाराष्ट्र या राज्यातील आदिवासी मतदारसंघांमध्ये भाजपाला राजकीय फायदा मिळेल.
७) या वर्षाच्या शेवटी गुजरात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. तसेच पुढील वर्षी राजस्थान व मध्य प्रदेश विधानसभेच्या निवडणुकीत होत आहेत त्या निवडणुकीत भाजपाला फायदा होणार आहे.

८) द्रौपदी मुर्मु या गरीब व दुर्बल घटक तसेच तळागाळातील लोकांसाठी आशेचा किरण बनले आहे.

९) राजकारणाच्या पलीकडे जाऊन विरोधी पक्षातील विधानसभेतील वेगवेगळ्या राज्यातील 104 आमदारांनी व 17 खासदारांनी द्रौपदी मुर्मु यांना मतदान केले आहे.

**संदर्भ:-**


१) टी.व्ही नाईन – दि. 21.0.7.2022
२) न्यूज 18 – दि. 21.07. 2022
३) टीव्ही नाईन – दि. 21.07.2022
४) लोकसत्ता – दि. 22.07.2022
५) लोकमत - दि. 22.07.2022
६) माझा पेपर - दि. 22.07. 2022
७) बीबीसी मराठी - दि. 22.07.2022
८) पुढारी - दि. 22.07.2022
९) दैनिक सामना - दि. 22. 07.22
१०) डी. डी. सह्याद्री बातम्या - दि. 22.07.2022